।। सा विद्या या विमुक्तये ।।

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपूरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED

"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)

Established on 17th September 1994-Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'B++' Grade

Phone: (02462) 215294 | **EXAMINATION DEPARTMENT** | Website: srtmun.ac.in

email : directorboee@srtmun.ac.in

संदर्भ : परीक्षा विभाग/२०२५-२६/६७२४ दिनांक : ०९/०९/२०२५

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत वाणिज्य पदवी व पदव्युत्तर महाविद्यालये,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : २ व ४ क्रेडीट वाणिज्य पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रश्नपत्रीकेच्या स्वरूपाबाबत—**
**संदर्भ : मा.अधिष्ठाता व सर्व मा.अभ्यासमंडळ अध्यक्ष यांच्या दिनांक ०४/०९/२०२५ च्या बैठकीतील निर्णय.**

महोदय,

उपरोक्त विषयी व संदर्भीय बैठकीतील निर्णयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून वाणिज्य पदवी प्रथम व द्वितीय वर्ष तसेच पदव्युत्तर प्रथम वर्ष अभ्यासक्रमासाठी ६०-४० या प्रमाणे पॅटर्न लागू करण्यांत आलेला असून हिवाळी-२०२५ च्या परीक्षा या प्रमाणेच होणार आहेत. पदव्युत्तर द्वितीय वर्षासाठी हिवाळी-२०२५ व उन्हाळी-२०२६ च्या परीक्षा ८०-२० पॅटर्न प्रमाणेच परीक्षा होणार आहेत. सदर बैठकीमध्ये खालील प्रमाणे प्रश्नपत्रीकेचे स्वरूप निश्चीत करण्यांत आले आहे.

**२ क्रेडीटसाठी प्रश्नपत्रीकेचे स्वरूप : परीक्षेसाठी २ तासाचा वेळ राहील.**

अ) २ क्रेडीटसाठी एकूण ५ प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नासाठी १० गुण राहतील.
ब) पहिला प्रश्न अनिवार्य राहील. पहिला प्रश्न हा संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असेल. तसेच पहिल्या प्रश्नांमध्ये एकूण ४ उपप्रश्न राहतील, प्रत्येक उपप्रश्नासाठी २.५ गुण राहतील.
क) उर्वरित २ ते ५ प्रश्नापैकी कोणतेही २ प्रश्न सोडवावेत.

**४ क्रेडीटसाठी प्रश्नपत्रीकेचे स्वरूप : परीक्षेसाठी २-३० तासाचा वेळ राहील.**

अ) ४ क्रेडीटसाठी एकूण ६ प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नासाठी १५ गुण राहतील.
ब) पहिला प्रश्न अनिवार्य राहील. पहिला प्रश्न हा संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असेल. तसेच पहिल्या प्रश्नामध्ये एकूण ५ उपप्रश्न राहतील, प्रत्येक उपप्रश्नासाठी ३ गुण राहतील.
क) उर्वरित २ ते ६ प्रश्नापैकी कोणतेही ३ प्रश्न सोडवावेत.

एन.ई.पी. अभ्यासक्रमातील पदवी व पदव्युत्तर प्रथमवर्षातील ८०-२० पॅटर्नच्या विद्यार्थ्यांना ६०-४० पॅटर्नप्रमाणेच प्रश्नपत्रीका देण्यांत येतील व ६०-४० प्रमाणे प्राप्त गुणांचे ८०-२० मध्ये रूपांतर करून त्यांना गुणपत्रके देण्यांत येतील. करीता सर्व प्राश्नीकांनी प्रश्नसंच तयार करतांना वरील प्रमाणे निश्चीत करण्यांत आलेल्या नियमाप्रमाणे प्रश्नसंच तयार करावे व मा.प्राचार्य यांनी सदर बाब सर्व संबंधित शिक्षक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणून द्यावी.

**प्र.संचालक,**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रत माहितीस्तव :
१) मा.अधिष्ठाता, वाणिज्य व व्यस्थापनशास्त्रे प्रस्तुत विद्यापीठ.
२) सर्व मा.अध्यक्ष, सर्व अभ्यासमंडळे यांना देवून कळविण्यांत येते की, सदर बाब सर्व प्राश्नीकांच्या निदर्शनास आणून द्यावी.